**इतर फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ३/२०१९**

**सी.एन.आर.क्र.एम.एच.एस.आय. ०९–०००१७०–२०१९**

**निशाणी क्र. ३६ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज हा सामनेवाला यांनी त्यांच्या विरोधात पारित करण्यात आलेले 'उलटतपास नाही' चा आदेश रद्द करुन मिळावा या करिता दाखल केला आहे.

२. सामनेवाला यांनी आपल्या अर्जामध्ये असे कथन केले आहे की, सामनेवाला यांचे वकील तसेच सामनेवाला हे दि.०४/०५/२०२६ रोजी न्यायालयात हजर नसल्याने न्यायालयाने सामनेवाला यांच्या विरोधात उलटतपास नाही असा आदेश पारित केला आहे. परंतु सामनेवाला यांना उलटतपास घेण्याची संधी नाकारणे म्हणजे नैसर्गिक न्याय तत्त्वांचा भंग करण्या सारखे होईल. सबब, अर्जातील कारणांचा विचार करता अर्ज मंजूर करुन सामनेवाला यांना उलटतपास घेण्याची संधी मिळावी अशी विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जावर अर्जदार यांनी म्हणणे दाखल करुन विरोध दर्शवला आहे. अर्जदार यांनी असे कथन केले आहे की, केवळ विलंब करण्या करिता सामनेवाला यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

४. अर्जाचे तसेच म्हणण्याचे अवलोकन केले. अर्जदार व सामनेवाला तर्फे वकील यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अर्जदार यांनी मूळ अर्ज महिलांचे कौटुंबिक हिंसाचारा पासून संरक्षण अधिनियम अंतर्गत दाखल केला आहे. प्रस्तुत अर्ज अंतिमत: न्यायनिर्णीत होणेकामी मूळ अर्जदार यांचा उलटतपास होणे आवश्यक वाटते. सदर उलटतपास झाल्यास मूळ अर्जदार यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. अर्जातील कारणांचा विचार करता पुढील मी पुढील प्रमाणे आदेश पारित करत आहे.

## – आदेश –

१. अर्ज नि.क्र.३६ मंजूर करण्यात येतो.

२. सामनेवाला यांनी अर्जदार यांना रक्कम रु.२००/– खर्चापोटी देण्याच्या अटीवर सामनेवाला यांच्या विरुध्द पारित करण्यात आलेला 'उलटतपास नाही' आदेश रद्दबातल करण्यात येईल.

SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Digitally signed by SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Date: 2026.07.04 11:52:47 +0530

( श्रीकांत एस. पचंडी )
दिनांकः ०४/०७/२०२६ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर देवगड